हिंदु विवाह अर्ज क्रं. ८४/२०२३
आशीष तांबारे वि. ऋतुजा तांबारे
निशाण ३९ लगत

**गैरअर्जदारा तर्फे अर्जदाराचा साक्षीदार क्रं. ०२ चा शपथेवर उलट तपास**

**श्री. एम. एच. जाधवर, विधीज्ञ यांचे तर्फे पुढे सुरू**

१८. अर्जदाराचे व गैरअर्जदाराचे लग्न २०२२ साली २२ तारखेला झाले. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाचा संपुर्ण खर्च गैरअर्जदाराचे वडिलांनी केला. हे म्हणणे खरे नाही की, ४०,०००/— रूपये व हुंडा ५ ग्रॅम सोन्याची अंगठी दिली. भांडे व संसारोपयोगी साहित्य दिले. हे म्हणणे खरे नाही की, ३ लाखापेक्षा जास्त खर्च गैरअर्जदार हिचे वडिलांनी केला. लग्नानंतर गैरअर्जदाराला आमचे गावी घेवून गेलो. त्यानंतर एक ते दोन महिणे व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांचेत किरकोळ कारणावरून भांडणे होवू लागले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर अर्जदार गैरअर्जदारास मारहाण करू लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझा मुलगा गैरअर्जदारास तु मला पसंद नाहीस असे म्हणत होता.

१९. माझे मुलाचा आधी विवाह झाला होता. त्याचा घटस्फोट झाला होता. त्यांचेत भांडण होत होते व ते राहायचे नाही म्हणुन घटस्फोट झाला. गैरअर्जदारासोबत ही अर्जदाराचे भांडणे होत होते. हे म्हण्णे खरे नाही की, माझा मुलगा गैरअर्जदारास म्हणत होता की, माझे तुझ्या सोबत जबरदस्तीने लग्न लावले आहे, तु मला पसंत नाही व मला सोडचिठ्ठी दे. हे म्हणणे खरे नाही की, सोडचिठ्ठी देण्यावरून अर्जदार गैरअर्जदारास रात्री मारहाण करायचा व घरा बाहेर हकलुन देत होता. हे म्हणणे खरे नाही की, तिला वारंवार उपासी ठेवत होता. हे म्हणणे खरे नाही की, शेतात नेवुन आशिषने ऋतुजाला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, शेतात आशिषने ऋतुजाचा मोबाईल फोडला. हे म्हणणे खरे नाही की, जिवे मारण्याची धमकी देवून घर सोडून जाण्यास सांगितले होते.

हे म्हणणे खरे नाही की, आशिषने मारहाण केलेमुळे लग्नानंतर सहा महिण्यात ऋतुजा माहेरी येवून राहिली.

२०. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने अर्जदारा विरूध्द पोलीस स्टेशन कळंब येथे तक्रार दिली होती. दि. २४/०४/२०१९ रोजी पोलीसांनी त्या तक्रारीच्या आधारे गैरअर्जदारास वैद्यकिय तपासणी करीता ग्रामीण रूग्णालय कळंब येथे पाठविल्याचे मला माहित नाही. ऋतुजाने भरोसा सेल धाराशिव येथे अर्ज केला होता. त्या अर्जाचे आधारे आम्हासर्वांना तेथे बोलाविले होते. तेथे मी सही केली होती. त्या अहवालात असे नमुद केले आहे की, आशिषला राग आलेमुळे त्याने तिला दोन चापटा मारल्या असे आशिष म्हणाला होता. त्यानंतर ऋतुजाला घेवून तिचे आजोबा नांदविण्यासाठी खडकी येथे घेवून तिला आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आशिष, मी व माझे घर—यांनी गैरअर्जदार, तिचे वडिल व आजोबा यांना शिवीगाळ करून घरात येयचे नाही, दारातुन निघुन जा अन्यथा जिवे मारून टाकु असी धमकी दिली.

२१. दि. १२/१०/२०२२ रोजी ऋतुजाने तिला नांदावयास घेवुन जाणेसाठी नोटीस पाठविली होती. त्याआधी दि. २८/०९/२०२२ रोजीही नोटीस पाठविली होती. साक्षीदार सांगतो की, नोटीस तर आली होती. त्या नोटीसचे उत्तर पाठविले होते.

प्रश्न :— नोटीस मिळालेनंतरही तुम्ही ऋतुजाला नांदायला नेले नाही

उत्तर :— नांदायला घेवून जाण्यासाठी आम्ही माणसे घेवून त्यांचेकडे गेलो होतो.

त्यानंतर माझे मुलाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. साक्षीदार सांगतो की, नांदायला ये किंवा घटस्फोट दे, या दोन्ही पैकी काहीं तरी करणेसाठी त्याने अर्ज

केला होता.

२२. हे म्हणणे खरे नाही की, छोटया मोठया कारणावरून भांडण करून गैरअर्जदार माहेरी जाण्याची धमकी देत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपसातील परिच्छेद क्रं. ४ व ५ मधील संपुर्ण मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे कुटूंबीय व गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती मिळून गैरअर्जदाराला नांदयला घेवून येणेसाठी गेलो असताना गैरअर्जदारानी व तिचे कुटूंबीयांनी शिवीगाळ करून नांदण्यास येयचे नाही असे म्हणुन हकलुन दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपसातील परिच्छेद क्रं. ८ मधील संपुर्ण मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

सही/—

(प्र. रा. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
कळंब

दिनांक :— १०/०७/२०२६